महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
एस्ट्रेला बॅटरीज एक्स्पॅन्शन कंपाऊंड इमारत, तळमजला, लेबर कॅम्प,धारावी रोड, माटुंगा,मुंबई-४०० ०१९.
दूरध्वनी क्र.०२२-६९४२५०००, ईमेल: agmhrrc@mahagenco.in

क्र.महानिर्मिती/स.महा.व्य.(मासं-सेप्र)/ - 8785 दिनांक: 18 AUG 2023

# सूचना

## जाहिरात क्र.१०/२०२२ अंतर्गत "सहाय्यक अभियंता" व "कनिष्ठ अभियंता" या पदांकरीता कागदपत्रे पडताळणीच्या अधीन राहून अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची यादी.

**संदर्भ**:- १) महानिर्मिती जाहिरात क्र.१०/२०२२
२) महानिर्मिती अधिसूचना क्र.१०८२४ दि.२१.११.२०२२
३) महानिर्मिती सूचना क्र.३६७१ दि.२१.०४.२०२३

महानिर्मिती सरळसेवा जाहिरात क्र. १०/२०२२ अंतर्गत सहाय्यक अभियंता व कनिष्ठ अभियंता या पदांकरीता पात्र उमेदवारांची महाराष्ट्र राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर दि.२६,२७ व २८ एप्रिल २०२३ रोजी ऑनलाईन परीक्षा पार पाडण्यात आली होती. त्याअनुषंगाने सहाय्यक अभियंता व कनिष्ट अभियंता या पदांकरीता उमेदवारांना लागू असणाऱ्या जाहिरातीतील विविध अटी व शर्तींच्या अनुषंगाने तसेच कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून निवड तसेच प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

ऑनलाईन परीक्षेतील गुणांच्या अनुषंगाने सहाय्यक अभियंता व कनिष्ठ अभियंता पदांकरीता जाहिरातीत नमूद रिक्त पदांनुसार तसेच सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची यादी तयार करण्यात आलेली आहे. तसेच ऑनलाईन परीक्षेकरीता उपस्थित सर्व उमेदवारांचे गुण प्रसिध्द करण्यात येत आहेत.

सहाय्यक अभियंता व कनिष्ट अभियंता या पदांकरीता कागदपत्रे पडताळणीच्या अधीन राहून निवड झालेल्या उमेदवारांची अंतिम निवड यादी / प्रतिक्षा यादी तसेच ऑनलाईन गुण प्राप्त करण्याकरीता खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

सहाय्यक अभियंता या पदाच्या ऑनलाईन परीक्षेकरीता उपस्थित सर्व उमेदवारांच्या गुणांची यादी ↵

कनिष्ठ अभियंता या पदाच्या ऑनलाईन परीक्षेकरीता उपस्थित सर्व उमेदवारांच्या गुणांची यादी ↵

सहाय्यक अभियंता मेकॅनिकल या पदाची कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून निवड / प्रतिक्षा यादी ↵

सहाय्यक अभियंता इलेक्ट्रीकल या पदाची कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून निवड / प्रतिक्षा यादी ↵

सहाय्यक अभियंता इन्स्टुमेंटेशन या पदाची कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून निवड / प्रतिक्षा यादी ↵

सहाय्यक अभियंता-महानिर्मिती कंपनीतील कर्मचाऱ्यांसाठी यांना राखीव पदांसाठी कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून निवड / प्रतिक्षा यादी

कनिष्ट अभियंता मेकॅनिकल या पदाची कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून निवड / प्रतिक्षा यादी

कनिष्ट अभियंता इलेक्ट्रीकल या पदाची कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून निवड / प्रतिक्षा यादी

कनिष्ठ अभियंता इन्स्ट्रुमेंटेशन या पदाची कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून निवड / प्रतिक्षा यादी

कनिष्ट अभियंता-महानिर्मिती कंपनीतील कर्मचाऱ्यांसाठी राखीव पदांसाठी कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून निवड / प्रतिक्षा यादी

**अटी व शर्ती** :-

१) उपरोक्त अंतिम निवड / प्रतिक्षा यादी ही उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, खेळामधील प्राविण्य, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण, इत्यादी माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून इत्यादी बाबतचे मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी ही रुजु होण्यापूर्वी कागदपत्रे पडताळणीच्या प्रक्रियेवेळी करण्यात येईल.

२) उपरोक्त अंतिम निवड / प्रतिक्षा यादीत नाव असलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात वैधता, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, खेळामधील प्राविण्य, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण, इत्यादी माहिती सादर करु न शकल्यास सदरील उमेदवारांची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

३) महानिर्मिती अधिसूचना क्र.११३१३ दि.०५.१२.२०२२ अन्वये उमेदवारांना सूचित केल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेदरम्यान सादर करणे बंधनकारक राहील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४) परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी, एका उमेदवाराकडून एका पदाकरीता एकच अर्ज करणे अपेक्षीत होते. तथापि, काही उमेदवारांनी एकाच पदाकरीता एकापेक्षा जास्त अर्ज केले असून, अशा प्रकरणी त्यांचा नवीनत्तम (Latest) अर्ज विचारात घेण्यात आला आहे. याशिवाय, ऑनलाईन अर्जातील माहितीत थोडा बदल करुन एकापेक्षा जास्त अर्ज केलेल्या आणि त्यानुसार एकापेक्षा अधिक प्रवेशपत्र प्राप्त झालेल्या उमेदवारांनी, ज्या प्रवेशपत्रावर ऑनलाईन परीक्षा दिली आहे, सदरील परीक्षार्थी क्रमांकानुसार त्यांचा विचार करण्यात आला आहे.

५) वरील नमूद निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया ही कोराडी प्रशिक्षण केंद्र तसेच नाशिक प्रशिक्षण केंद्र येथे राबविण्यात येईल व त्याबाबतची सूचना लवकरच महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर देण्यात येईल.

६) कागदपत्रे पडताळणीअंती पात्र ठरत असलेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मुख्य अभियंता (तांत्रिक) या विभागामार्फत निर्गमित करण्यात येतील. नियुक्ती आदेश निर्गमित केल्यानंतर ५२ आठवडयाच्या इंडक्शन लेव्हल ट्रेनिंगसाठी (Induction level Training) स्वतंत्र यादी महानिर्मिती कंपनीच्या प्रशिक्षण विभागाकडुन महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार उमेदवारांनी प्रशिक्षणासाठी रुजु व्हावे.

७) महानिर्मिती प्रशासकिय परिपत्रक क्र.५०८ दि.१६.११.२०२२ नुसार फक्त ज्या उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जात महानिर्मिती कंपनीचे पात्र सर्वसमावेशक प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी / प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी असल्याचे नमूद केले आहे व सदरील अर्जानुसार ऑनलाईन परीक्षेस हजर असतील, फक्त अशा उमेदवारांनाच (त्यांच्या प्रशिक्षणाबाबतचा अहवाल संबंधित विद्युत केंद्राकडून पडताळणी केल्यानंतर) अतिरिक्त गुण देण्यात आले आहेत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८) उपरोक्त अंतिम निवड / प्रतिक्षा यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही. सदरील यादी ही पूर्णत: जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता, इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधिन राहून प्राप्त गुणानुसार तयार करण्यात आली आहे.

९) सहाय्यक अभियंता व कनिष्ठ अभियंता या पदांकरीता जाहिरातीतील नमूद असलेली पूर्वावश्यकता अंतिम निवड / प्रतिक्षा यादीत नाव असलेले उमेदवारांचे धारण करीत नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधिल कोणत्याही अटींचा व शर्तींचा भंग होत असेल तर संबंधित उमेदवारांची निवड तावडतोब कोणत्याही टप्प्यांवर तसेच रुजू झाल्यानंतरही उमेदवारी रद्द करण्यात येईल.

१०) उपरोक्त अंतिम निवड / प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या उमेदवारांनी विविध समांतर व सामाजिक आरक्षणातंर्गत अर्ज सादर केले असल्यास त्याबाबतचे जाहिरातीतील अटी व शर्ती तसेच शासनाने पारीत केलेले संबंधित आरक्षणातंर्गत नियम व शर्तींच्या अनुषंगाने कागदपत्रे असणे ही संपूर्णत: उमेदवारांची जबाबदारी आहे. तसेच सदरील कागदपत्रे उमदेवारांनी सादर न केल्यास उमेदवारांची निवड ताबडतोब रद्द करण्यात येईल.

११) जाहिरातीत नमूद केल्यानुसार, वरील निवड / प्रतिक्षा यादीत नाव असलेल्या आणि कागदपत्रे पडताळणीअंती पात्र ठरत असलेल्या उमेदवारांना महानिर्मिती कंपनीत प्रवर्गनिहाय उपलब्ध रिक्त पदांनुसार टप्प्या-टप्प्याने नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील. तथापि, त्यांची जेष्ठता यादी ही ऑनलाईन परिक्षेतील गुण व ५२ आठवडयांच्या इंडक्शन लेव्हल ट्रेनिंगचे (Induction level Training) गुण एकत्रित करुन ठरविण्यात येईल. तसेच नियुक्ती आदेश हे सामाजिक आरक्षणानुसार उपलब्ध पदाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत असल्याने, सदरील आदेश हे गुणानुक्रमे नसून रिक्त पदांच्या अनुषंगाने असतील, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१२) महानिर्मिती कंपनीतील कर्मचाऱ्यांकरीता राखीव असलेल्या पदांकरीता, त्यांना प्राप्त गुणांनुसार संबंधित शाखेत (मेकॅनिकल, इलेक्ट्रीकल व इन्स्टुमेंटेशन) प्रथम प्राधान्य देण्यात आले आहे. तदनंतर गुणानुक्रमे कंपनीतील कर्मचाऱ्यांसाठी राखीव असलेल्या पदांसाठी संबंधित आरक्षित प्रवर्गातंर्गत निवड करण्यात आली आहे. महानिर्मिती कंपनीच्या ज्या कनिष्ट अभियंता उमेदवारांचे / कर्मचाऱ्यांचे ५२ आठवडयाचे (ILT) प्रतिक्षास्तर प्रशिक्षण पुर्ण झाले आहे, अशा उमेदवारांना पुन:श्च प्रशिक्षण देण्यात येणार नाही. त्यांची सेवाज्येष्टता वर नमुद केल्यानुसार टरविण्यात येईल.

१३) महाराष्ट्र शासन निर्णयानुसार गुणवत्ताधारक खेळाडू प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांच्या खेळाडू प्रमाणपत्राची पडताळणी संबंधित विभागामार्फत करण्यात येईल व त्यानंतरच सदरील उमेदवारांना रुजू करण्यात येईल.

१४) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.१२.०२.२०१९ व त्यानंतर पारीत केलेले त्यासंबंधीतचे इतर शासन निर्णयांमध्ये नमूद केल्याप्रमाणे "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (EWS) या प्रवर्गातून निवड / प्रतिक्षा यादीत नाव समाविष्ट असलेल्या उमेदवारांनी "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (EWS) या प्रवर्गात मोडत असल्याचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. सदर प्रमाणपत्रात, उमेदवाराचे स्वत:चे उत्पन्न असल्यास, स्वत:चे व कुटुंबाचे एकत्रित उत्पन्न हे "आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी" (EWS) कमाल उत्पन्न मर्यादेच्या आत असल्याबाबत नमूद असणे आवश्यक आहे. कागदपत्रे पडताळणीअंती "आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे" (EWS) प्रमाणपत्र प्राप्त करुन घेताना, उमेदवाराने खोटी माहिती अथवा अपात्र असताना देखील "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (EWS) प्रमाणपत्र प्राप्त केल्याचे निष्पन्न झाल्यास, उमेदवारास तात्काळ "अपात्र" ठरविण्यात येईल आणि सदरील उमेदवाराविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१५) दिव्यांग प्रवर्गातर्गत निवड / प्रतिक्षा यादीत नावाचा समावेश असलेल्या उमेदवाराने जाहिरातीत नमूद दिव्यांग प्रकाराचेच आणि जो दिव्यांग प्रकार (Nature Of Disability) त्यांनी अर्जात नमूद केला असेल, त्याच दिव्यांग प्रकाराचे विहीत नमुन्यातील सक्षम प्राधिकारी यांचेकडून निर्गमित प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. यात तफावत आढळून आल्यास उमेदवारास तात्काळ "अपात्र" घोषित करण्यात येईल.

१६) शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या शासन निर्णयांच्या अनुषंगाने दिव्यांग व अनाथ आरक्षणातून उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. सदरील निवड यादी तयार करताना, प्रथमत: दिव्यांग व अनाथ उमेदवारांची गुणानुक्रमे यादी तयार करण्यात आली आहे व तदनंतर त्यांना त्यांनी अर्ज केलेल्या संबंधित सामाजिक प्रवर्गात स्थलांतरीत करण्यात आले आहे.

१७) वरील नमूद प्रतिक्षा यादी ही सूचना प्रसिध्द केल्यानंतर ०१ वर्षाकरीता लागू राहील. तसेच संबंधित प्रतिक्षा यादीत नाव समाविष्ठ असल्याने निवड यादीतील कोणताही उमेदवार अपात्र / रुजू न झाल्यास त्यांच्या जागी नियुक्ती देण्याबाबत उमेदवारांकडे कोणताही हक्क नसेल. त्याबाबतचा निर्णय महानिर्मिती कंपनी आवश्यकतेनुसार राखून ठेवत आहे.

१८) प्रतिक्षा सूचीत निवड करण्यात आलेल्या महिला उमेदवारांच्या प्रकरणी, प्रतिक्षा सूची कार्यान्वीत करताना उमेदवारांना प्राप्त गुण लक्षात घेऊन गुणानुक्रमे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील, याची विशेष नोंद सर्व संबंधित उमेदवारांनी घ्यावी.

१९) उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेले सामाजिक व समांतर आरक्षण व इतर बाबीं सदरील उमेदवार सिध्द न करु शकल्यास त्या उमेदवारांचा सामान्य / अराखीव प्रवर्गातर्गत विचार करण्यात येणार नाही,तसेच त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

२०) वरील निवड / प्रतिक्षा यादी तयार करताना ज्या उमेदवारांस समान गुण प्राप्त झाले आहेत, अशा प्रकरणी वयाने जेष्ट उमेदवारास प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच सदरील बाब ही निवड झालेल्या उमेदवारांच्या सेवाजेष्ठतेतही लागू करण्यात येईल.

२१) वरील निवड / प्रतिक्षा यादीत नाव असल्याने उमेदवारांना नियुक्तीबाबतचे कोणतेही हक्क असणार नाही.

२२) वरील निवड / प्रतिक्षा यादी ही वरील जाहिराती विरुध्द मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्रमांक १०८२/२०२३ व इतर रिट याचिका तसेच इतर न्यायालयात दाखल रिट याचिकांच्या अधिन असेल.

२३) उपरोक्त अंतिम निवड / प्रतिक्षा यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

२४) सहाय्यक अभियंता व कनिष्ट अभियंता या पदांच्या भरती प्रक्रियेबाबतची पुढील प्रक्रिया जाणून घेण्याकरीता वेळोवेळी महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

**(डॉ.धनंजय सावळकर)**
कार्यकारी संचालक (मासं), महानिर्मिती